**बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, नागपूर**

**माहिती पुस्तिका व सूचना**

**नागपूर राजभवन जैवविविधता उपवनास शाळांनी दिलेल्या भेटीसंबंधात**

राजभवन जैवविविधता उपवन हे नागपूर शहराच्या केंद्रस्थानी स्थित आहे. हे विषयनिष्ठ उपवन महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून विकसित करण्यात आले आहे. जैवविविधता उपवन निसर्ग शिक्षणाची उत्तम संधी देते आणि विशेषत:, शालेय विद्यार्थ्यांकरिता गुणग्राहक आहे. फुलपाखरु उद्यान, वनौषधी उद्यान, औषधी वनस्पतींचे उद्यान, निवडुंग (कॅक्टस) उद्यान, इत्यादींसारख्या विषयनिष्ठ विभागांसह हे जैवविविधता उपवन, विद्यार्थ्यांना त्यांचे ज्ञान वृध्दिंगत करण्याची उत्तम संधी देईल. जैवविविधता उपवनातील निसर्ग झलक (खुणा), स्थानिक जैवविविधता पाहण्याची व समजून घेण्याची सर्वोत्कृष्ट संधी देते.

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी ही, भारतातील सर्वात जुन्या, प्रख्यात अशासकीय संघटनांपैकी एक संघटना आहे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने तिच्या नागपूर येथील व्याघ्र कक्ष कार्यालयामार्फत जैवविविधता उपवनामध्ये विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण शिक्षण कार्यक्रम चालविण्याची जबाबदारी हाती घेतली आहे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग, निसर्गविषयक विविध शिक्षण उपक्रम आयोजित करील. या उपक्रमांमध्ये राजभवन, नागपूरच्या जैवविविधता उपवन क्षेत्रातील निसर्ग झलक (खुणा), चित्रपट कार्यक्रम (फिल्म शो), स्लाईड शो, स्पर्धा, इत्यादी उपक्रमांचा समावेश होतो.

इच्छुक शाळांनी, या अनन्यसाधारण जैवविविधता उपवनास भेट देण्यासाठी त्यांच्या विद्यार्थ्यांना पाठविण्याकरिता विनंती केली आहे. विद्यार्थ्यांना क्षेत्रीय अनुभवातून शिकण्याची संधी मिळेल आणि निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेताना त्यांचे ज्ञान समृद्ध होईल.

यथोचितरीत्या भरलेला नोंदणी नमुना (खाली दिलेला) पुढील पत्त्यावर पाठवावा किंवा इ-मेल करावा. तुकडीच्या (बॅच) भेटीसाठी तारखांचे वाटप, 'प्रथम योणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केले जाईल. भेटीच्या तारखेच्या किमान ७ दिवस अगोदर शाळेला पुष्टीकरण पत्र देण्यात येईल.

संपर्क:
**श्री.संजय करकरे**
सहायक संचालक, बीएनएचएस, नागपूर
बी-१, वंदना को.ऑप.हाऊसिंग सोसायटी,
रामदासपेठ, नागपूर
भ्रमणध्वनी क्रमांक **९५५२५९५९६२**
**इ-मेल:** sanjay.karkare@gmail.com

## सूचना

- राजभवन हे, महाराष्ट्राचे सन्माननीय राज्यपाल यांचे अधिकृत निवासस्थान आहे. हे एक निर्बंधित क्षेत्र आहे. त्यादृष्टीने राजभवनाचे पावित्र्य राखणे महत्त्वाचे आहे.
- राजभवन जैवविविधता उपवन पर्यावरणविषयक शिक्षण केंद्र (बीपीइइसी) हे, एक निसर्गविषयक जनजागृती केंद्र आहे. ते मनोरंजन किंवा करमणूक उपवन नाही.
- जैवविविधता उपवन, रविवार व शासकीय सुट्ट्यांखेरीज सर्व दिवशी विद्यार्थ्यांच्या भेटीकरिता खुले असेल.
- केवळ पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांच्या एका तुकडीला त्यांच्या शिक्षकांसोबत परवानगी देण्यात येईल. जैवविविधता उपवनास भेट देण्यासाठी शिक्षकांसह केवळ शालेय विद्यार्थ्यांनाच परवानगी आहे.
- दोन शिक्षकांसह एका तुकडीत कमाल ४० विद्यार्थ्यांचा समावेश असेल.
- बीएनएचएसच्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांद्वारे हा तीन तासांचा पर्यावरण विषयक शिक्षण अभ्यास दौरा (सहल) आयोजित केला जातो.
- प्रत्येक तुकडीसाठी रु.२००/- इतके नोंदणी शुल्क प्रदेय असेल. जैवविविधता उपवन भेटीची नोंदणी, नमुना व शुल्क यांसह आगाऊ करण्यात यावी. राजभवनाच्या **http://rajbhavan.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावरून नमुना, उतरवून (डाऊनलोड) घेता येऊ शकेल किंवा **sanjay.karkare@gmail.com** या इ-मेलवरून मागविता येऊ शकेल.
- भेटीच्या वेळा पुढीलप्रमाणे असतील:

  **सकाळची तुकडी : सकाळी ८.०० ते ११.००**

  **दुपारची तुकडी : दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.००**
- कार्यक्रमाची नोंद (बुकींग), किमान १५ दिवस अगोदर करणे गरजेचे आहे.
- जर अपेक्षित तारखा उपलब्ध नसतील तर, पर्यायी तारखा दिल्या जातील.
- भेट रद्द झाल्यास कोणताही परतावा मिळणार नाही. पर्यायी दिवस देण्यात येतील.
- भेटीच्या वेळी विद्यार्थी व शिक्षक यांची स्वतंत्र यादी सादर करावी लागेल.
- विद्यार्थ्यांना शाळेच्या गणवेषात यावे लागेल. प्रत्येकाने एक वही व पेन घेऊन येणे अपेक्षित आहे.
- तेथे उपहारगृहाची सुविधा नाही. पिण्याचे पाणी उपलब्ध आहे. विद्यार्थी सुका अल्पोपहार (dry snacks) आणू शकतात.
- कचरा, धूम्रपान, मद्यपान,प्लास्टिक पिशव्यांचा वापर, मोठ्याने बोलणे, संगीत लावणे, फुले तोडणे, फांद्या तोडणे, नमुना गोळा करणे यांस सक्त मनाई आहे.
- तेथे ने – आण करण्याची (pick up and drop) सुविधा नाही. प्रत्येक शाळेने त्यांची स्वत:ची वाहतूक व्यवस्था करावी.
- शाळेच्या वाहनांना केवळ राजभवनच्या सदर द्वारा (गेट) तूनच प्रवेश करण्यास परवानगी देण्यात येईल

| | | |
|---|---|---|
| शाळेचे नाव | : | ……………………………………………………………………… |
| माध्यम<br>(इंग्रजी /मराठी / हिंदी/ उर्दू) | : | ……………………………………………………………………… |
| पत्ता | : | ………………………………………………………………………<br>……………………………………………………………………. |
| दूरध्वनी क्रमांक | : | ……………………………………………………………………… |
| मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका | : | ……………………………………………………………………… |
| भ्रमणध्वनी क्रमांक | : | ……………………………………………………………………… |
| भेटीची तारीख | : | ……………………………………………………………………… |
| वेळ | : | सकाळी ८.०० ते ११.००/दुपारी २.०० ते संध्या. ५.०० |
| भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या | : | ……………………………………………………………………… |
| भेट देणाऱ्या शिक्षकांची संख्या | : | ……………………………………………………………………… |
| नोंदणी शुल्क | : | ……………………………………………………………………… |
| प्रदानाचा प्रकार | : | रोख /दर्शनी धनाकर्ष /धनादेश / बँक हस्तांतरण |

(****'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' यांच्या नावाने**, धनादेश/दर्शनी धनाकर्ष काढावेत)

**:घोषणापत्र:**

नागपूर राजभवन, जैवविविधता उपवनास भेट देण्याकरिता आमच्या शाळेच्या नावाची आम्ही नोंदणी केली आहे.  आम्ही याद्वारे आमची स्वत:ची संपूर्ण जबाबदारी घेण्याची हमी देतो आणि भेटीच्या वेळी आणि भेटीदरम्यान कोणताही अपघात होऊन इजा झाल्यास आणि मालमत्तेचे नुकसान झाल्यास देखील त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी व राज भवन जबाबदार असणार नाही याची हमी देतो.  आकस्मिकपणे रुग्णालयात दाखल करण्याचा/उपचार करण्याचा प्रसंग उद्भवल्यास, आवश्यक कारवाई करण्यासाठी आम्ही बीएनएचएसच्या अधिकाऱ्यांना  किंवा प्रमुखांना प्राधिकार देत आहोत आणि त्याचा संपूर्ण खर्च आम्ही देऊ.

जैवविविधता उपवनाच्या सर्व नियमांचे व विनियमांचे पालन करण्याची आणि कार्यक्रमाचे प्रमुख व स्वयंसेवक यांनी दिलेल्या सूचनांचे काळजीपूर्वक पालन करण्याची देखील आम्ही हमी देतो.

दिनांक :

मुख्याध्यापकाची / मुख्याध्यापिकेची स्वाक्षरी

शाळेचा शिक्का